# सार्वजनिक सूचना / इच्छा अभिव्यक्ती (EOI) – आदित्य एज्युकेशनल कॅम्पस, बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे कॅफेटेरिया चालकाची नियुक्ती

श्री अमेय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या बोरिवली (पश्चिम), मुंबई येथील **'आदित्य एज्युकेशनल कॅम्पस'** मधील कॅफेटेरियाचे संचालन आणि व्यवस्थापन करण्यासाठी; अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्ती, संस्था, कंपन्या, खाद्यसेवा पुरवठादार, कॅटरर्स आणि कॅफेटेरिया चालकांकडून **'इच्छा-अभिव्यक्ती' (EOI)** मागविण्यात येत आहेत. आमच्या परिसरामध्ये उच्च शिक्षणाच्या अनेक संस्था असून तिथे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि अभ्यागत यांची मोठी संख्या आहे; त्यामुळे तिथे कॅफेटेरिया चालवण्यास मोठी संधी उपलब्ध आहे.

निवडलेला ऑपरेटर FSSAI आणि इतर वैधानिक प्राधिकरणांनी विहित केलेल्या मानकांनुसार कॅम्पस कॅफेटेरियाच्या कामकाजासाठी आणि व्यवस्थापनासाठी जबाबदार असेल. सेवांची व्याप्ती, पात्रतेचे निकष, आवश्यक कागदपत्रे आणि निवड प्रक्रिया यांबाबतच्या सविस्तर माहितीसाठी, इच्छुक पक्ष आमच्या www.ameyatrust.org या संकेतस्थळावरून अर्ज डाउनलोड करू शकतात. इच्छुक पक्ष त्यांचे अर्ज बंद लिफाफ्यातून किंवा ई-मेलद्वारे १७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करू शकतात. ट्रस्ट कोणत्याही प्रकारचे कारण न देता कोणताही किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतो आणि सर्वोच्च आर्थिक प्रस्ताव निवडण्यास बांधील राहणार नाही.

**लिफाफ्यावर किंवा ईमेलच्या विषयात खालीलप्रमाणे नमूद करा:**
**"कॅफेटेरिया चालकाच्या नेमणुकीसाठी इच्छा-अभिव्यक्ती (EOI) - आदित्य एज्युकेशनल कॅम्पस"**

**संपर्क तपशील: सचिव**
**श्री अमेय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे**
**आदित्य एज्युकेशनल कॅम्पस**
आर. एम. भट्टड रोड, राम नगर, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२
ईमेल: info@ameyatrust.org | संपर्क क्रमांक: ०२२ - ३५२०६१११

**दिनांक:** ११.०८.२०२६
**स्थळ:** मुंबई